# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/११/२०१६

**१) चाकुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/११/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील फिर्यादी भाष्कर मोहन शहारे वय ४५ वर्ष, रा. तुडमापुरी हा बाजार घेवुन गावाकडे जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीस तु आमचे भांडण का सोडविलास असे म्हणुन आपल्या खिश्यातील चाकु काडुन फिर्यादीच्या डावे हाताच्या अंगठयावर व जवळील बोटाला चाकुने मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) ट्रकने मोटार सायकलला धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यु . . :–**

दिनांक ०६/११/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. छाया प्राणहंस अहिर वय ४५ वर्ष, रा. मांडवी हिचा पती मृतक प्राणहंस केवराम अहीर वय ५० वर्ष, रा. मांडवी हा शेता कडुन गावाकडे ओळखीचे वरकडे याची मोटार सायकल क्र. एमएच ३१ एटी ६१०१ वर मागे बसुन जात असतांना खमारी कडुन येणा–या यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन समोरुन येणा–या मोटार सायकलला धडक मारल्याने मोटार सायकल सोबत खाली पडल्याने मागे बसलेला मृतक यांचे डोक्यावरुन आयशर ट्रक गेल्याने डोक्याला जबर मार लागुन डोक फुटुन मृतक जागीच मरण पावल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेश्राम पो. स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) रात्रीचे वेळी अंधारात आपले अस्तित्व लपवुन हत्यार जवळ बाळगतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ६/११/२०१६ रोजी ३.०० वा. दर. यातील आतील आरोपी हा रात्र दरम्यान आपले अस्तित्व लपवुन कोणतेही कायदेशीर परवानगी शिवाय घरफोडीचे हत्यासारखे ~~हत्यार~~ सब्बल जवळ बाळगुन संशयीतरित्या मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खोपले पो. स्टे वरठी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १२२ (ई) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो. स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०६/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७४ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व ईतर वाहनांवरती ६८ केसेस आणि अवैद्य प्रवासी ०१ केस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.